# याशोगाथा

## जिल्हा परिषद उस्मानाबाद

## कृषी विभाग

## राष्ट्रीय बॉयोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम

## 2019-20

## पंचायत समिती

## उस्मानाबाद.

**लाभधारकाचे नाव :- श्रीमती. जिजाबाई विलास सुर्यवंशी**

**रा. गोगाव ता. उस्मानाबाद**

**संयत्राचा प्रकार :- दिनबंधू**

**संयत्राचा आकार :- 6 घ. मी.**

**कुटुंबातील सदस्य संख्या :- 10 व्यक्ती**

**बायोगॅस संयत्र घेण्यापुर्वीची स्थिती :-** बॅयोगॅस संयत्र घेण्यापुर्वी आम्ही स्वयंपाकासाठी व इतर कामासाठी एल.पी.जी. गॅस सिलेंडर चा वापर करीत होतो. एखादे वेळेस वेळेवर गॅस सिलेंडर मिळाले नाही तर शेतातील झाडे तोडून सरपणासाठी वापर करीत होतो. धुरामुळे घरातील कपडे, भांडी, घराच्या भिंती काळ्या पडत होत्या. तसेच धुराचा त्रास देखील डोळयांना होत होता. शिवाय प्रदुषणाची हानी मोठ्या प्रमाणात होत होती.




**बायोगॅस संयत्र घेतल्यानंतरची स्थिती :** सन 2019-20 अंतर्गत बायोगॅस संयत्र बांधकाम करण्यासाठी पंचायत समिती येथे विहित नमुन्यातील अर्ज करुन 6 घ. मी. आकाराचे बायोगॅस संयत्र बांधकाम करण्यासाठी परवानगी मिळाल्यानंतर बायोगॅस संयत्र बांधकामासाठी लागणारे सर्व आवश्यक असणारे साहित्य जमा करुन घेतल्यानंतर विस्तार अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित गवंडी कडुन

6 घ. मी. आकाराचे बायोगॅस सयंत्राचे बांधकाम करुन घेतले व नंतर 20 दिवसांनी संयत्रामध्ये शेण, पालापाचोळा व पाणी टाकुन बायोगॅस शेण व पाण्याने भरुन घेतल्यानंतर 8 दिवसांनी गॅस ची निर्मीती झाली. नंतर बाजारातुन 2 शेगडया खरेदी करुन 2 कुटुंबासाठी गॅस कनेकशन देवुन वापर चालु करण्यात आलेला आहे. यापुर्वी आमच्या दोन कुटुंबाना महिन्याकाटी दोन गॅस सिलेंडर च्या टाक्या लागत होत्या. त्या आता बंद झाल्या असुन महिन्याकाठी सरासरी 1500 रुपयाचे अर्थिक बचत झालेली आहे. तसेच वेळेची पण बचत झालेली आहे.




सदर गॅस चे स्फोट होण्याची भीती नाही. वापरण्यास सोयीस्कर असून या पासून निघणारी सॅलरी उत्तम कपोस्ट खत म्हणून शेतामध्ये वापरत आहे. त्यामुळे माझे शेतीचे उत्पान्नात शिश्चितच वाढ होणार आहे.

सदर योजना अत्यंत चांगल्याप्रकारची आहे.

| | |
|---|---|
| **श्रीमती जिजाबाई विलास सुर्यवंशी** | **गट विकास अधिकारी वर्ग-1,** |
| **रा. गोगाव ता. उस्मानाबाद.** | **पंचायत समिती, उस्मानाबाद.** |

# याशोगाथा

## जिल्हा परिषद उस्मानाबाद

## कृषी विभाग

## राष्ट्रीय बॉयोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम

## 2019-20

## पंचायत समिती

## उस्मानाबाद.

**लाभधारकाचे नाव :- श्री. बाळासाहेब भारत पडवळ**

**रा. उपळा मा. ता. उस्मानाबाद**

**संयत्राचा प्रकार :- दिनबंधू**

**संयत्राचा आकार :- 6 घ. मी.**

**कुटुंबातील सदस्य संख्या :- 5 व्यक्ती**

**जनावरांची संख्या :- 6**

**बायोगॅस संयत्र घेण्यापुर्वीची स्थिती :-** मी मौजे उपळा मा. येथील रहिवाशी असुन आमचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. माझ्या कुटुंबात एकुन 6 व्यक्ती आहेत. बायोगॅस संयत्र घेण्यापुर्वी आम्ही गॅस सिलेंडर चा वापर करीत होतो गॅस टाकी संपल्यावर गॅस टाकी वेळेवर मिळत नसल्याने जळणावर स्वयंपाक करावे लागत असे. त्यामुळे घराच्या भिंती काळया पडत असे व भांडे ही काळे पडत होते. धुरामुळे महिलांना डोळयास त्रास पण होत असे.



**बायोगॅस संयत्र घेतल्यानंतरची स्थिती :** आमच्या गावचे ग्रामसेवकाने बायोगॅस संयत्र बांधकाम बाबत माहिती दिली व बायोगॅस संयत्र बांधकामाचे महत्व ग्रामसभेत सांगितले नंतर आम्ही पंचायत सकितीचे कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांची भेट घेऊन या योजनेची सविस्तर माहिती घेवुन पंचायत समितीकडे विहित नमुन्यातील अर्ज दिले व अर्ज मंजुर झालेनंतर 6 घन मिटर आकाराचा बायोगॅस संयत्र प्रथम स्वखर्चाने बांधकाम कुशल गवंडी मार्फत बांधुन पुर्ण करुन घेतले. आज माझे संपुर्ण कुटुंबास स्वयांपाकास लागणारा गॅस मिळत असुन गॅस सिलेंडर वरिल खर्च व वेळेची बचत होऊन उत्कृष्ट प्रकारचे कुजलेले कंपोस्ट खत पिकासाठी मिळत आहे. त्यातुन सुध्दा पिकाच्या उत्पादनात वाढ होत आहे. वर्षाकाठी सरासरी 9 ते 10 हजार रुपयाची आर्थिक बचत झालेली आहे. योजना खुप चांगली आहे.




**श्री. बाळासाहेब भारत पडवळ**
**रा. उपळा मा. ता. उस्मानाबाद.**

**गट विकास अधिकारी वर्ग-1,**
**पंचायत समिती, उस्मानाबाद.**

# याशोगाथा

## जिल्हा परिषद उस्मानाबाद
## कृषी विभाग

## राष्ट्रीय बॉयोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम

## 2019-20

## पंचायत समिती

## उस्मानाबाद.

**लाभधारकाचे नाव :- श्री. रामदास काशिनाथ पवार**
**रा. उपळा मा. ता. उस्मानाबाद**
**संयत्राचा प्रकार :- दिनबंधू**
**संयत्राचा आकार :- 6 घ. मी.**
**कुटुंबातील सदस्य संख्या :- 6 व्यक्ती**
**जनावरांची संख्या :- 6**

**बायोगॅस संयत्र घेण्यापुर्वीची स्थिती :-** मी मौजे उपळा मा. येथील रहिवाशी असुन माझे कुटुंबात एकुण 6 व्यक्ती आहे. आमचा मुख्य व्यवसाय शेती असुन त्यास जोडधंदा म्हणुन भाजीपाला ची शेती करित आहे. बायोगॅस घेण्यापुर्वी आम्ही चुलीवर स्वयंपाक करीत होतो. गॅस सिलेंडर चा पण वापर काटकसरीने करीत होतो. चुलीवर स्वयंपाक करीत असल्यामुळे घरातील भांडे कपडे काळे पडत असे व धुराचा महिलांचा त्रास होत असे.




**बायोगॅस संयत्र घेतल्यानंतरची स्थिती :** पंचायत समितीकडुन बायोगॅस संयत्र बांधकाम करण्यासाठी शासन अनुदान मिळत असल्याचे माहित झाल्यानंतर आम्ही पंचायत समिती उस्मानाबाद येथे कृषी विभागातील कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांची भेट घेऊन बायोगॅस योजने बाबत सविस्तर माहिती घेवुन बायोगॅस संयत्र बांधकाम करण्याचे निश्चित करुन लगेच पंचायत समितीकडे अर्ज केला व अर्ज मंजुर झालेनंतर आम्ही प्रथम स्वखर्चाने 6 घ. मी. आकाराचे दिनबंधु बायोगॅस

संयत्राचे बांधकाम पुर्ण करुन घेतले व नंतर कृषी विभागातील अधिकाऱ्याने सांगितल्या प्रमाणे 20 दिवसांनी बायोगॅस यंत्रामध्ये शेण, पालापाचोळा व पाणी टाकुन घेतल्यानंतर 8 दिवसात गॅस निमीत्ती झालेनंतर लागणारी शेगडी बाजारातुन खरेदी करुन गॅस चालु केला. आज रोजी 5 मानसांना दोन वेळचे स्वयंपाक व इतर कामे करुन गॅस शिल्लक राहत आहे. हा गॅस वापरायला सोपे आहे.




स्फोट होण्याची भिती नाही. पाहीजे तेव्हा वापर करता येतो. आमचा महिन्याकाठी 1000 रुपयांची आर्थिक बचत झाली आहे. गॅस संयत्र बांधलेमुळे गॅस तर मिळतच आहे. पण आमचे कडे असणाऱ्या भाजीपाला व फळ बागेकरीता सॅलरी मिळत आहे. त्यामुळे आमच्या उत्पादनात निश्चितच वाढ होणार आहे.

शासन अनुदान मिळाल्यामुळेच मी बायोगॅस संयत्राचे बांधकाम करु शकलो ही योजना अत्यंत चांगली आहे.

**श्री. रामदास काशिनाथ पवार**
**रा. उपळा मा. ता. उस्मानाबाद.**

**गट विकास अधिकारी वर्ग-1,**
**पंचायत समिती, उस्मानाबाद.**